महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३९ वा दिनांक : २८/१०/२०२४ वार : सोमवार

## निवडणुकीनंतर अजित पवारांचे राजकारण संपणार - उत्तमराव जानकर



**मुंबई :** विधानसभा निवडणुकीनंतर अजित पवार यांचे राजकारण संपलेले असेल. ते त्यांच्या गुरांच्या गोठ्याच्या मूळ व्यवसायाकडे परततील, अशी टीका शरद पवार गटाचे उमेदवार उत्तमराव जानकर यांनी केली. शरद पवार गटाच्या वतीने उत्तमराव जानकर यांना माळशिरसमधून उमेदवारी देण्यात आली. उमेदवारी मिळाल्यानंतर जानकर यांनी प्रतिक्रिया देत अजित पवारांवर निशाणा साधला आहे. लोकसभेला बारामतीत त्यांच्या पत्नीच्या झालेल्या अवस्थेप्रमाणेच अजित पवारांची अवस्था होणार आहे, असेही जानकर म्हणाले.

उत्तमराव जानकर म्हणाले की, विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात अजित पवार संपलेले दिसतील. लोकसभा निवडणुकीला बारामती मतदारसंघातून त्यांच्या पत्नीचा मोठा फरकाने पराभव झाला होता. अजित पवारांची देखील तीच अवस्था होणार असून ते किमान ७५ हजार मतांनी मागे राहतील, असे जानकर म्हणाले. विधानसभा निवडणुकीनंतर अजित दादा त्यांच्या गुरांच्या गोठ्याच्या मूळ व्यवसायाकडे परततील, असा टोला देखील उत्तमराव जानकरांनी लगावला आहे.




## निवडणुकीनंतर फडणवीस अन् ठाकरे एकत्र येणार - रामदास आठवले



**मुंबई :** विधानसभा निवडणुकीनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट होऊ शकते, असा दावा केंद्रीय मंत्री आणि रिपाइंचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी केला आहे. महायुतीच्या जागावाटपात मित्र पक्ष असलेल्या रिपाइं पक्षाच्या वाट्याला जागा न आल्याने रामदास आठवले नाराज झाले आहेत. त्यांनी आज पत्रकार परिषद घेऊन आपली नाराजी उघडपणे बोलून दाखवली. यासोबतच आठवले यांनी उद्धव ठाकरे यांना महायुतीसोबत येण्याची ऑफरही दिली आहे.

रामदास आठवले म्हणाले की, 'मी आणि माझ्या पक्षातील अनेक कार्यकर्ते नाराज आहेत, आमचा पक्ष छोटा जरी असला तरी जागा हव्या होत्या. मागे फडणवीसांना पत्र लिहून किमान ५ जागा देण्याची मागणी केली होती. मात्र, जागा मिळाल्या नाहीत. त्यामुळे उमदेवारी अर्ज दाखल करण्यासाठी जाणार नसल्याचे कार्यकर्ते म्हणत आहेत.

रामदास आठवले म्हणाले की, २०१२ मध्ये भाजपसोबत आलो. आज आरपीआय कुठेच दिसत नाही. मी त्यांच्याकडे नाराजी व्यक्त केली आहे. धारावी किंवा चेंबूरच्या जागेसाठी आम्ही आग्रही होतो. महामंडळाची देखील मागणी केली आहे. जिल्हा परिषद, महापालिकेसंदर्भात देखील चर्चा झाली आहे. आरपीआयला डावलून चालणार नाही. आम्हाला सत्तेत वाटा मिळाला पाहिजे. मी महायुतीच्या बाजूने आहे. मी केंद्रात मंत्री असल्याने इतर राज्यात देखील पक्षाच्या जागा वाढवतो, त्यामुळे आम्हाला जागा मिळाल्या पाहिजेत, असे आठवले म्हणाले.

उद्धव ठाकरेंना दिली ऑफर

रामदास आठवले यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला. काँग्रेस पक्ष उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला मजबूत करण्याऐवजी खिळखिळा करत आहे, असे ते म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी महायुतीकडे परत यावे, अशी ऑफर ठाकरेंना दिली. उद्धव ठाकरे हे महायुती सोबत राहिले असते तर एकनाथ शिंदे फुटलेच नसते, असा दावा त्यांनी केला. देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांची भेट निवडणुकीनंतर होऊ शकते, असेही आठवले यांनी म्हटले आहे.

## मला तुरुंगात कित्येकदा उपाशी झोपावे लागले - अनिल देशमुख



**मुंबई :** माजी गृहमंत्री तथा शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख यांनी रविवारी सकाळी त्यांच्या 'डायरी ऑफ ए होम मिनिस्टर' या आत्मचरित्रातील दोन उतारे सोशल मीडियावर शेअर केली आहेत. यामध्ये त्यांनी तुरुंगात आलेला अनुभव तसेच एका टरबूज्या नावाच्या गलेलठ्ठ उंदराची गोष्ट सांगितली. मी तुरुंगात कित्येकदा उपाशी झोपलो आहे, असा दावा देशमुख यांनी आपल्या आत्मचरित्रात केला. तसेच देवेंद्र फडणवीस यांची तुलना गलेलठ्ठ उंदराशी केली. तर त्यांच्या पुन्हा येईन या घोषणेची अनिल देशमुख यांनी खिल्ली उडवली आहे.

अनिल देशमुख यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिले की, महाराष्ट्राच्या राजकारणातील टरबूज्या - लवकरच तुम्हाला समजेल मी कोणाबद्दल बोलतोय! माझी थरारक आणि अंगावर काटा आणणारी आत्मकथा 'डायरी ऑफ ए होम मिनिस्टर' मधील १६ आणि २० नंबरच्या प्रकरणातील काही उतारे तुमच्याशी शेअर करतोय. ही फक्त एक झलक आहे, या पुस्तकात टरबूजाच्या विकृत राजकारणाचे खरे रूप जनतेसमोर आणणारे अनेक धक्कादायक खुलासे आहेत.

तुरुंगात अनेकांना घरचे जेवण दिले जात असे. मात्र मला घरचे जेवण द्यायला न्यायालयाची परवानगी नव्हती, म्हणून मला तुरुंगातील जेवणच दिले जायचे. तुरुंगातील जेवण कसे असते याचा अंदाज वाचक लावू शकतात; मात्र, त्यापेक्षाही तुरुंगातील जेवण कितपत सुरक्षित आहे, याची सतत धाकधूक असायची. संपूर्ण तुरुंगात आणि माझ्याही सेलमध्ये उंदीर-चिचुंद्रयांची अगदी भाऊगर्दीच होती. कित्येकदा तर असे व्हायचे की जेवण यायचे आणि मला जेवायला थोडा जरी उशीर झाला, तर तोवर उंदीर-चिचुंद्रया त्यावर तुटून पडलेल्या असायच्या. यामुळे कित्येकदा माझ्यावर उपाशी झोपण्याची पाळी आली. रविवारी आणि सरकारी सुट्टीच्या दिवशी तर जेवणाची परिस्थिती आणखीच खराब असायची; कारण रविवारी दुपारी १२ वाजता सेलचे दरवाजे जे बंद व्हायचे, ते थेट दुसऱ्या दिवशी १२ वाजता उघडायचे. म्हणजेच रविवारी दुपारी १२ वाजता जे जेवण मिळायचे त्यावरच दुसऱ्या दिवशी जेवण मिळेपर्यंतची वेळ मारून न्यावी लागायची. त्याशिवाय रविवारी दुपारी आलेले जेवण उरवून उंदीर-चिचुंद्रयांपासून त्याचे रक्षण करण्यासाठी ते बादलीच्या वर ठेवून त्याची राखण करत बसावे लागायचे ते वेगळेच, असा अनुभव अनिल देशमुख यांनी पुस्तकात पान क्रमांक १८० वर सांगितला आहे.

अनिल देशमुख यांनी पुढे टरबूजा हा उल्लेख केला आहे. ते लिहितात की, तुरुंगात तसे तर खूपच उंदीर आणि चिचुंद्रा होत्या. त्यामध्ये एक उंदीर वेगळा होता. अगदी गलेलठ्ठ. साहजिकच तुरुंगातले सगळे त्याला टरबूजा म्हणायचे. त्याला कितीही दूर हाकलायचा प्रयत्न केला तरीही तो अशा काही नजरेने बघायचा की जणू काही ती नजर सांगत असायची मी पुन्हा येईन... मी पुन्हा येईन... मी पुन्हा येईन..! असे देशमुख यांनी नमूद केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २८ ऑक्टोबर २०२४


# आकोल्यातून ५०० कार्यकर्त्यांचा राजीनामा

## निवडणुकीच्या तोंडावरच भाजपला मोठे खिंडार!



**अकोला** :आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांकडून उमेदवारांच्या नावांची घोषणा केली जात आहे. या प्रक्रियेत मात्र अनेक इच्छुक उमेदवारांना संधी दिली जात नाही, तर काही ठिकाणी मित्र पक्षासाठी जागा सोडली जात असल्याने महायुती तसेच महाविकास आघाडी पक्षातील कार्यकर्ते नाराज असल्याचे समोर येत आहे. असेच अकोला जिल्ह्यातील मूर्तीजापूर येथे मोठी घडामोड घडत आहे. भाजपचे जवळपास ५०० पदाधिकाऱ्यांनी राजीनामा दिल्याची चर्चा सुरू आहे.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे आज नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असल्याने मूर्तीजापूरच्या भाजप पदाधिकाऱ्यांचा मोठा ताफा नांदेडच्या दिशेला रवाना झाल्याची माहिती आहे. दरम्यान, शनिवारी रात्रीच जवळपास ३०० पेक्षा अधिक कार्यकर्त्यांनी राजीनामे पाठवले होते. त्यानंतर रविवारी मतदारसंघातील बार्शीटाकळी तालुक्यातील २०० पेक्षा जास्त कार्यकर्त्यांनी देखील राजीनामे पाठवले आहेत.

भाजपच्या दुसऱ्या यादीतही मूर्तीजापूर येथील भाजपचे आमदार हरिष पिंपळे यांचे तिकीट कापले जाण्याची शक्यता असल्याने भाजप पक्षातील कार्यकर्ते नाराज असल्याचे बोलले जात आहे. पिंपळे यांचे तिकीट कापत शरद पवार गटातून भाजपमध्ये आलेल्या रवी राठी यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या विरोधात आज बार्शीटाकळी तालुक्यातील शेकडो भाजप पदाधिकाऱ्यांनी राजीनाम्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये भाजपचे तालुकाध्यक्ष, शहर प्रमुख, बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख या पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. या सर्व पदाधिकाऱ्यांनी हरीष पिंपळे यांच्याशिवाय दुसरा उमेदवार चालून घेणार नसल्याचा इशारा पक्षाला दिला आहे.

विधानसभा निवडणुकीच्यापूर्वी महायुतीमधील घटक पक्षांमधील असलेला नाराजीचा सूर निवडणुकीत काय परिणाम करेल यावर आता लक्ष असणार आहे. महायुतीमधील उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाला देखील भाजप पक्षातील अनेक नेते व कार्यकर्त्यांचा विरोध आहे. अशा स्थितीत महायुती समोर निवडणुकीत मोठे आव्हान उभे असणार असल्याचे बोलले जात आहे.

# आंतर महाविद्यालयीन ताईक्वानदो स्पर्धा संपन्न











**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, व जे.ई.एस महाविद्यालय जालना . यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन ताईक्वानदो जालना ज़ोन क्रीडा स्पर्धा दि. 17 ऑक्टोबर २०२४ रोजी संपन्न झाल्यात. या स्पर्धेत जालना झोन आणि सेंट्रल झोन चे स्पर्धकांनी भाग घेतला, जालना जिल्ह्यात पहिलांदाच ताईक्वानदो स्पर्धेचे यजमान पद जे.ई.एस महाविद्यालयाला मिळाले. स्पर्धेत विविध महाविध्यालयातील आलेले खेळाडूंचा झोन निहाय सहभाग होता तसेच चार झोनचे एकूण 6 4 स्पर्धकांनी स्पर्धेत भाग घेतला. स्पर्धेत विजयी खेळाडूंना विद्यापीठातर्फे मेडल्स आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले स्पर्धेचे उदघाट्न ताईक्वानदो संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री.अरविंद देशमुख यांच्या हस्ते झाली, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविधालयाचे प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री हे होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा क्रीडाअधिकारी श्री संजय गाढवे , महाराष्ट्र ताईक्वानदो संघटनेचे अध्यक्ष डॉ.अविनाश बरगजे, डॉ.भुजंग डावकर, जालना जिल्हा क्रीडा सचिव डॉ.हेमंत वर्मा, डॉ. राजेंद्र सोनवणे उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमात उपस्थित होते. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जिमखाना क्रीडा आयोजन समितीचे,डॉ.वसंत पवार, डॉ. सुनील इंदूरकर, डॉ . किशोर बिर्कयालु डॉ.प्रवीण चंदनशिवे, डॉ.यास्मिन शेख, श्री राहुल सारस्वत, श्री.विलास बोधले,यांनी परिश्रम केले.






# जयभवानीत बालविवाह मुक्ती जनजागृती अभियान




**पाटोदा** : जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालयात "बालविवाह मुक्ती बीड जिल्हा अभियान व सती सावित्री समिती, महिला नियंत्रण कक्ष" यांच्या संयुक्त विद्यमाने उत्साहात राबविण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कदम, प्रा.सोमनाथ घाडगे, कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा.सतिश जरांगे, ग्रंथपाल श्रीमती प्रा.ज्योती रकटे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

या बालविवाह मुक्ती जनजागृती अभियानात विद्यार्थीनीने वडिलांना बालविवाह नको या विषयावर पत्र लेखन, बालविवाह मुक्ती जनजागृती रॅली काढण्यात आली. त्या नंतर कु.सानिका मळेकर या विद्यार्थ्यांनीनी मुलींना बालविवाह मुक्तीची शपथ दिली.

शेवटी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी बालविवाह रोखणे ही काळाची गरज आहे.आपण सर्वांनी बालविवाह रोखावेत असे विद्यार्थ्यांना अवाहन केले.

या कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी केले.तर आभार प्रा.बाळासाहेब जोशी यांनी व्यक्त केले.हे बालविवाह मुक्ती जनजागृती अभियान यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. डॉ.गोविंद बामदळे,प्रा.बजरंग डिसले,प्रा.शिवाजी मोरे,श्री.शहाजी लवुळ,श्री.दत्ता चादर यांनी अथक परिश्रम घेतले.या प्रसंगी बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २८ ऑक्टोबर २०२४


## सिद्धी कदम यांना शरद पवार गटाकडून उमेदवारी



**सोलापूर :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने रविवारी ९ उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली आहे. या यादीची घोषणा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी मुंबईतील पक्षकार्यालयात पत्रकार परिषदेत केली. विशेष म्हणजे या यादीत २६ वर्षीय सिद्धी रमेश कदम यांना देखील उमेदवारी देण्यात आली आहे.

मोहोळ विधानसभा मतदारसंघात २६ वर्षीय सिद्धी रमेश कदम यांना उमेदवारी जाहिर करण्यात आली आहे. सिद्धी कदम या रमेश कदम यांच्या कन्या आहेत. मुंबई येथील टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्समधून शिक्षण पूर्ण केले आहे. आत्तापर्यंत जाहीर करण्यात आलेल्या उमेदवारांमध्ये सिद्धी कदम या सोलापूर जिल्ह्यातील सर्वात तरुण उमेदवार आहेत. सिद्धी कदम यांचे वडील रमेश कदम हे अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ गैरव्यवहार प्रकरणात अटकेत असताना २०१९ च्या निवडणुकीत सिद्धी कदम यांनीच प्रचार यंत्रणा सांभाळली होती.

आर्थिक गैरव्यवहार घोटाळा कोणता? अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळातील ३१२ कोटी रुपयांच्या आर्थिक घोटाळ्याप्रकरणी माजी आमदार रमेश कदम यांना अटक करण्यात आली होती. ऑगस्ट २०२३ साली ते तुरुंगातून बाहेर आले. रमेश कदम यांना तब्बल ८ वर्षे तुरुंगवास या प्रकरणामुळे भोगावा लागला होता. ठाणे येथील मध्यवर्ती कारागृह तुरुंगात त्यांना ठेवण्यात आले होते. २०२३ साली जामीन मिळाल्यावर त्यांनी पुन्हा राजकारणात सक्रिय सहभाग घेण्यास सुरुवात केली होती.

काही आठवड्यांपूर्वीच रमेश कदम यांनी शरद पवारांची भेट घेत मोहोळ विधानसभा मतदारसंघातून उमेदवारीची इच्छा व्यक्त केली होती. मात्र त्यांच्यावरील आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप असल्याने शरद पवार गटाकडून रमेश कदम यांची कन्या सिद्धी यांना उमेदवारी दिल्याचे दिसत आहे. दरम्यान, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाकडून मोहोळ विधानसभा मतदारसंघात यशवंत माने यांना संधी दिली आहे.

## एक को दिल्ली भेजता, दुसरे को भोकरदन मे बिठाता : अब्दुल सत्तार



**सिल्लोड :** 'एक का कल्याण करता दिल्ली को भेजता, दुसरे का बिस्मिल्ला करता भोकरदन मे बिठाता', असे वक्तव्य शिंदे गटाचे आमदार अब्दुल सत्तार यांनी केले आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे. या वक्तव्याचे सिल्लोड मतदारसंघात पडसाद उमटण्याची चर्चा होत आहे. सध्या सत्तार यांचे हे विधान सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

लोकसभा निवडणुकीत भाजपचे माजी खासदार रावसाहेब दानवे यांचा पराभव झाला होता. सत्तार यांनी दानवेंचा प्रचार न करता कॉंग्रेसचा उमेदवार निवडून आणल्याचा सत्तार यांच्यावर आरोप होत आहे. त्यामुळे अब्दुल सत्तार आणि दानवे यांच्यात वितुष्ट आल्याचे समोर आले होते. त्यातच आता अब्दुल सत्तार यांनी असे विधान केल्यामुळे आणखी वाद उफाळण्याची चर्चा आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अब्दुल सत्तार आपला मतदारसंघ पिंजुन काढत आहेत. मतदारसंघातील एका गावात संवाद साधताना त्यांनी रावसाहेब दानवे आणि खासदार कल्याण काळे यांच्याबाबत एक वक्तव्य केले. कल्याण काळे यांचे कल्याण करुन त्यांना दिल्लीत बसवले तर रावसाहेब दानवेंचा बिस्मिल्ला केला आणि भोकदनला बसवले, असे म्हटले. अब्दुल सत्तार यांच्या या विधानानंतर विधानसभा निवडणुकीपूर्वीच राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे. रावसाहेब दानवे या विधानावार काय प्रतिक्रिया देतात, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## राज्यात महायुतीचेच सरकार येणार - देवेंद्र फडणवीस



**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीची तारीख आता काही दिवसांवर आली आहे. या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांनी आता जोरदार तयारी करण्यास सुरुवात केली आहे. उमेदवारांची नावे देखील जाहिर करणे सुरू असून ही प्रक्रिया देखील आता अंतिम टप्प्यात आली आहे. यंदा सरकार कोणाचे येणार यावर बोलताना महायुतीचे सरकारच येईल असा दावा केला आहे.

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, हरियाणाबाबत सगळे पोलपंडीत सांगत होते भाजपाचा दारुण पराभव होणार. पण भाजपाला प्रचंड बहुमत मिळाली. त्यामुळे सकाळी टीव्हीसमोर बोलणारे दुपारी काय बोलू या संभ्रमात पडले होते, असे म्हणत त्यांनी संजय राऊत यांच्यावर नाव न घेता टोला लगावला आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला काही प्रमाणात यश मिळवता आले. फेक नरेटिव्हच्या भरवशावर त्यांनी यश मिळवले, असे ते म्हणाले.

लोकसभेच्या निवडणुकीत व्होट जिहाद झाला पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, राहुल गांधींनी आरक्षण कसे संपवणार याचा फॉर्म्युला सांगितला. नाना पटोले त्यांचीच रि ओढत आहेत. तसेच लोकसभेच्या निवडणुकीत व्होट जिहाद हा महत्त्वाचा घटक होता. सगळी धार्मिक स्थळे आणि धर्मगुरु व्होट जिहादचा नारा देत होते. आता याचा फायदा होणार नाही. तसेच व्होट जिहादमुळे बहुसंख्य समाजाच्या लक्षात आले की मोदी नकोत म्हणून व्होट जिहाद करणार असेल तर मतपेटीतून उत्तर देता येईल. त्यामुळे फेक नरेटिव्ह आता चालणार नाही.

लाडकी बहीण योजनेवर काय म्हणाले देवेंद्र फडणवीस? लाडकी बहीण योजनेबाबत मी हे सांगू इच्छितो की आमच्या विरोधकांचं कन्फ्युजन बघा. लाडकी बहीण योजनेमुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था कोलमडणार, निवडणुकीनंतर योजना बंद होणार. दुसरीकडे तेच भाषणांमध्ये सांगतात की हे १५०० रुपये देतात आम्ही निवडून आलो तर २००० रुपये देऊ. यांच्याकडे खजिना आहे का? पैशांचं झाड आहे? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला आहे.

## मुलींनी अहिल्याबाईंसारखे कणखर व्हावे- कुलगुरू डॉ. बारहाते



**अमरावती :** कर्तृत्ववान, मुत्सद्दी, लढवय्या म्हणून देशभरात ज्यांची ख्याती आहे, अशा पुण्यश्लोक अहिल्याबाईंसारखे विद्यार्थिनींनी कणखर, सक्षम व्हावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्र आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या संयुक्त सहकार्याने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त नुकतेच विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्राच्या सभागृहात एक दिवसीय अभ्यास शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षीय विवेचन करताना कुलगुरू बोलत होते.

या प्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून व्यवस्थापन परिषद सदस्य, डॉ. नितीन चांगोले, उद्घाटक म्हणून व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भैयासाहेब मेटकर, डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्राचे संचालक डॉ. संदीप जोशी, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. बारहाते म्हणाले, अहिल्याबाईंच्या खांद्यावर इंदूर संस्थानची धुरा आल्यानंतर अनेक संकटे आलीत. मात्र, त्यांनी समर्थपणे संकटांचा सामना केला. इंदूर शहराच्या विकासात त्यांचा फार मोठा हातभार आहे. द्वारका, काशी विश्वनाथ, त्र्यंबकेश्वर, ओंकारेश्वर, औंढा नागनाथ आदी तीर्थक्षेत्राचा त्यांनी विकास केला. याशिवाय अनेक मंदिरांचा अहिल्याबाईंनी जीर्णोद्धार केला. अनेक मंदिरे, घाट उभारलीत. विविधांगी असे अहिल्याबाईंचे व्यक्तिमत्व आहे. त्यामुळे विद्यार्थिनींनी अहिल्याबाईंच्या चरित्रातून प्रेरणा घेऊन सक्षमपणे आपल्या पायावर उभे राहावे, असे आवाहन कुलगुरूंनी या प्रसंगी उपस्थित विद्यार्थिनींना केले.

संत गाडगे बाबा, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीप प्रज्वलन करून विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविकातून डॉ. श्रीकांत पाटील यांनी अभ्यास शिबिरामागील भूमिका विषद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अभिजित इंगळे यांनी केले, तर आभार डॉ. प्रीती निकम यांनी मानले. एक दिवसीय अभ्यास शिबिराच्या उद्घाटनपर कार्यक्रमाला प्राधिकारिणींचे सदस्य, विद्यापीठातील शिक्षकवृंद, अधिकारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते, असे कळवण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी केवळ सामाजिक व शैक्षणिकच कार्य केले नाही, तर त्यांनी महिलांचे सक्षमीकरण सुद्धा केले.

अहिल्याबाईंना त्यांचे सासरे मल्हारराव होळकर यांच्याकडून लहानपणापासूनच राजनीतीचे धडे मिळाले. त्यामुळे त्यांनी आपले संस्थान सक्षमपणे सांभाळले. मंदिरांचे संरक्षण, सती प्रथेला बंदी, गोरगरिबांसाठी सोयीसुविधा अहिल्याबाईंनी निर्माण केल्यात. त्यामुळेच त्यांचा लोकमाता म्हणून आदराने उल्लेख केला जातो, असे मत व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भैयासाहेब मेटकर यांनी उद्घाटनपर भाषणातून व्यक्त केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २८ ऑक्टोबर २०२४


## कन्नड विधानसभेची जागा बंजारा समाज लढवणार
## समाज बांधवांच्या बैठकीत एकमुखी निर्णय

**कन्नड (अक्षय चव्हाण) :** तालुक्यात विधानसभा निवडणूक लढण्यासाठी इच्छुक उमेदवारांची उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असतानाच कन्नड - सोयगाव तालुक्यातील बंजारी समाजाने एकत्र येऊन कन्नड विधानसभेची निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला केला आहे. बंजारा समाजाचे कन्नड तालुक्यात निर्णायकच नव्हे तर समाजाचा उमेदवार निवडून येऊ शकतो. ऐवढ मतदान कन्नड -सोयगाव मतदारसंघात आहे. त्यामुळे बंजारा समाज कन्नड-सोयगाव विधानसभेची निवडणूक लढणार असल्याची माहिती बंजारा समाजाच्या एका समाज बांधवांनी (दि.26) ला शनिवारी बोलतांना सांगितले. पुढे बोलतांना ज्या समाज बांधवाची कन्नड - सोयगाव विधानसभा निवडणुक लढवण्याची इच्छा आहे अशा इच्छुकांनी आप-आपल्या परिने 29 ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करावे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दोन-तीन दिवस अधी पुन्हा तालुक्यातील बंजारा समाज बांधवाची बैठक घेऊन समाजाच्या वतीने एक उमेदवार जाहीर करण्यात येणार आहे. असा एकमुखी निर्णय बैठकीत घेण्यात आला आहे. यावेळी अनिल चव्हाण, केशव राठोड, उत्तमराव राठोड, डॉ. सिताराम जाधव, डॉ. मनोज राठोड आदींसह तालुक्यातील बंजार समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

## शिंदे गटाच्या नेत्यांच्या जरांगेंसोबतच्या भेटीगाठी वाढल्या

**आंतरवाली सराटी :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. मराठा आंदोलक यांनी जिथे निवडून येण्याची शक्यता आहे, तिथे उमेदवार देणार असल्याचे जाहीर केले आहे. तर उर्वरित ठिकाणी उमेदवार पाहून निर्णय घेणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

महायुतीतील नेते मनोज जरांगे यांची भेट घेण्यासाठी आंतरवाली सराटीत दाखल होत आहेत. शिंदे गटाचे नेते संजय शिरसाठ यांनी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर मनोज जरांगे यांची आज भेट घेतली. दोघांमध्ये जवळपास तासभर चर्चा झाली. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शिंदे गटाच्या नेत्यांच्या मनोज जरांगे यांच्याशी भेटीगाठी वाढल्या आहेत. मंत्री उदय सामंत यांनी कालच जरांगेंची भेट घेतली होती. पण त्यांच्यात नेमकी कोणती चर्चा झाली हे समजू शकले नाही. या भेटीवेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ओएसडी मंगेश चिवटे हे देखील उपस्थित होते. त्यानंतर आज शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी आंतरवाली सराटीत मनोज जरांगे यांची भेट घेतली आहे. शिंदे गटाच्या नेत्यांचे आंतरवालीत दौरे वाढल्यामुळे विविध चर्चांना उधाण आले आहे.

काही दिवसांपूर्वी भाजप नेते राधाकृष्ण विखे पाटील हे देखील मनोज जरांगे यांची भेट घेण्यासाठी मध्यरात्रीनंतर आंतरवाली सराटीत दाखल झाले होते. मध्यरात्रीनंतर जरांगे आणि विखे पाटील यांच्यात १५ ते ३० मिनिटे चर्चा झाली होती. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या भेटीनंतर शरद पवार गटाचे आमदार राजेश टोपे हे देखील मनोज जरांगेंच्या भेटीसाठी आंतरवाली सराटीत पोहोचले होते. रात्री पावणे तीन वाजता दोघांमध्येही बैठक झाली. मात्र, या बैठकीत नेमकी कोणत्या विषयावर चर्चा झाली, हे अद्याप समजू शकले नाही.

लोकसभा निवडणुकीत मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलाच गाजला होता. जरांगे फॅक्टरमुळे महायुतीला अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे काही नेत्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती. आता विधानसभा निवडणुकीत कोणतीही धोका पत्कराची राजकारण्यांची इच्छा नाहीये. विधानसभा निवडणुकीत कोणताही फटका बसू नये, म्हणून अनेक नेत्यांची जरांगे यांच्यासोबत भेटीगाठी सुरु असल्याचे बोलले जात आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002


## विद्याभारती महाविद्यालयात जिल्हास्तरीय अविष्कार स्पर्धा



**अमरावती :** स्थानिक कॅम्प परिसरातील विद्याभारती महाविद्यालयात शुक्रवारी जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाच्या दृकश्राव्य सभागृहात करण्यात आले.

या प्रसंगी संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. मिथिलेश राठोर कार्यक्रमाच्या अध्यक्ष, तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठातील राज्यपाल नामित व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. आर. एम. कडू, विद्यापीठाच्या अविष्कार समन्वयक डॉ. वैशाली धनविजय, संस्थेचे सचिव डॉ. ए. डी. चव्हाण, कोषाध्यक्ष रघुनाथ रोडे, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रज्ञा येनकर, आविष्कारचे जिल्हा समन्वयक डॉ. जी. टी. लामधाडे उपस्थित होते.

आज देशातील संशोधकांना चालना मिळण्यासाठी प्रामुख्याने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या संशोधनाचा दर्जा वाढवण्याची गरज वाटते. यासाठी विद्यापीठ स्तरावर वेगवेगळ्या संशोधनात्मक प्रकल्पाद्वारे विद्यार्थी संशोधकांना संशोधनात्मक सुविधा पुरवण्याचा विद्यापीठाचा नेहमीच प्रयत्न असतो, असे प्रतिपादन व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. आर. एम. कडू यांनी उद्घाटनप्रसंगी केले. आपल्या संबोधनात त्यांनी आविष्कार संकल्पनेचा हेतूची मांडणी केली. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. येनकर यांनी केले. स्पर्धेच्या समन्वयक डॉ. वैशाली धनविजय यांनी स्पर्धेच्या अटी सांगताना तसेच राज्य शासनाच्या वेगवेगळ्या प्रकल्पांमध्ये आविष्कार हा विद्यापीठस्तरीय महत्त्वपूर्ण प्रकल्प असल्याचे सांगितले.

डॉ. मिथिलेश राठोर यांनी स्पर्धेसाठी उपस्थित सर्व नवचैतन्यमय संशोधक तसेच त्यांच्या मार्गदर्शकांचा परिचय स्पर्धेतून विद्यापीठाने घडवून दिल्याबद्दल स्वागत केले. कार्यक्रमाचे आभार स्पर्धेचे जिल्हा समन्वयक डॉ. लामधाडे यांनी मानले.

यांनी केले स्पर्धेचे परीक्षण : डॉ. एस. एस. लांडे, डॉ. सी. एम. देशमुख, डॉ. संतोष म्हस्के, डॉ. रत्नशील खोब्रागडे, डॉ. अरविंद तायडे, डॉ. मनीषा कोडापे, डॉ. नीरज धनवटे, डॉ. पवन चिचोळे, डॉ. वैभव अढावू, डॉ. संदीप जोशी, डॉ. आर. एन. कऱ्हाडे.

१४५ पोस्टरसह १२४ प्रतिकृतींचे प्रदर्शन आविष्कार स्पर्धेत अमरावती जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील एकूण १४५ पोस्टर, १२४ नाविन्यपूर्ण मॉडेल विद्यार्थ्यांकडून सादर करण्यात आले. विशेष करून ग्रामीण भागातील विद्यार्थी सहभागी झाले होते.

## शिंदे गटाचे माजी आमदार बबनराव घोलप यांचा शिवसेना ठाकरे गटात प्रवेश



**नाशिक :** आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच पक्षातील उमेदवारांची नावे जाहीर करण्यात येत आहेत. मात्र अनेक इच्छुक उमेदवारांना तिकीट मिळत नसल्याने त्यांनी बंडखोरीचा पर्याय निवडलेला दिसत आहे.

याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. माजी आमदार बबनराव घोलप यांनी शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला असून शिंदे गटाला राजीनामा दिला आहे.

शिवसेना शिंदे गटाचे उपनेते व माजी आमदार बबनराव घोलप यांनी शनिवारी शिंदे गटाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला असून रविवारी त्यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे व युवसेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत घरवापसी केली आहे. बबनराव घोलप यांनी शिंदे गटाला राजीनामा दिल्याने नाशिकमध्ये शिंदे गटाला मोठे खिंडार पडले आहे.

बबनराव घोलप यांचे पुत्र योगेश घोलप यांना ठाकरे गटाकडून देवळाली विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे. बबनराव घोलप हे लोकसभा निवडणुकीच्या तोंडावरच शिंदे गटात गेले होते. मात्र अवघ्या ६ महिन्यातच बबनराव घोलप यांनी घरवापसी केली आहे. शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी निवडणुकीपूर्वी ठाकरे गटात प्रवेश केला होता. वाकचौरे यांच्यासोबत वाद असल्याने घोलप यांनी ठाकरे गटाला रामराम करत शिंदे गटात प्रवेश केला होता.

दरम्यान, कारंजा विधानसभा मतदारसंघातून स्व. राजेंद्र पाटणी यांचे पुत्र ज्ञायक पाटणी यांनी देखील भाजपला राजीनामा देत शरद पवारांच्या पक्षात प्रवेश करत उमेदवारी देखील मिळवली आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडी वेगाने घडताना दिसत आहेत. त्यामुळे निवडणुकीची उत्सुकता आणखी शिगेला पोहोचताना दिसत आहे.